ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- I

JAN - FEB 2023

Original Research Article

मांडणी तसेच अभ्यासक्रम शिकवण्याचे तंत्र नव्याने विकसित करणे आवश्यक ठरणारे आहे. सायबर युगात नॅनो टेक्नॉलॉजीनंतर आता अवतरत असलेले कोडींग, मशीन लर्निग, आर्टिफिशियल इंटलिजेंट, रोबोटीकचे नवे विश्व, यात निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी याचा प्राध्यापकांनी अभ्यास करायला हवा आणि आपल्या शिकविण्याचे तंत्र सुध्दा बदलायला हवे.

मराठी वाङमय हा कला शाखेतील एक विषय असून या विषयाचा उल्लेख सर्वसामान्यपणे मराठी असाच केला जातो. त्यामुळे हा विषय हा भाषा विषय आहे असा एक दृष्टिकोन विद्यार्थ्यांचा असतो. स्वाभाविकपणे मराठी काय शिकायचे? असाही नकारात्मक सूर विद्यार्थ्यांमध्ये दिसून येतो. विद्यार्थ्यांच्या विशिष्ट मानसिकतेचा सहवास लाभल्यामुळे प्राध्यापकांना सुद्धा याच विचाराची लागण होते आणि ते सुद्धा आपल्या विषयाचा उल्लेख मराठी साहित्य किंवा मराठी वाङ्मय असा न करता केवळ मराठी असाच करतात. एकूणच या विषयाकडे किंवा या विषयाच्या नावाकडे पाहण्याची विद्यार्थ्यांची आणि प्राध्यापकांचीच भूमिका सर्वप्रथम बदलण्याची आवश्यकता आहे.

मराठी भाषेच्या विकासाच्या वाटचालीमध्ये महत्त्वाचे योगदान असलेले मराठी वाङ्मयाचे वैशिष्ट्य विद्यार्थ्यांनी समजून घेणे आणि भविष्यातील मराठी वाङ्मयाच्या वाटचालीमध्ये महत्त्वाचा हातभार लावणे, त्यामध्ये लेखक, समीक्षक आणि प्राध्यापक, पत्रकार या व्यक्तिमत्त्वांची निर्मिती होणे, हे उद्दिष्ट या विषयाच्या अभ्यासक्रम निर्मितीमध्ये तसेच शिकवण्याच्या तंत्रामध्ये अपेक्षित असायला हवे. परंतु अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने तयार होणारे विद्यार्थी हे केवळ समीक्षक बनण्याचे कारखाने असावे अशी मांडणी केलेली दिसते. या मांडणीमध्ये महत्त्वपूर्ण बदल अपेक्षित आहे. वाङ्मयाचा इतिहास, व्याकरण, साहित्यशास्त्र, समीक्षा शास्त्र, समाज आणि साहित्य यांचा संबंध, आधुनिक मराठी साहित्यपरिचय, भाषांतर-रूपांतर-अनुवाद आणि भाषिक कौशल्य अशा स्वरूपाचा तृतीय वर्ष कला शाखेचा मराठी वाङमय विषयाचा अभ्यासक्रम आहे. प्रथम वर्षापासून या अभ्यासक्रमाची मांडणी होत असताना विद्यार्थ्यांना नाटक, कविता, कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन अशा साहित्य प्रकारांचा परिचय करून देणारा अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला आहे. या अभ्यासक्रमातून आपल्याला असे आढळून येते की यात अभ्यासक हा केवळ परिचयात्मक स्वरूपात माहिती संकलित करतो, परंतु साहित्यप्रकार निर्मिती, नव्या माध्यमांमध्ये काम करण्याची प्रत्यक्षातील पद्धती, बदलणारा समाज आणि त्यात आपले व्यक्तिमत्व मराठी वाङ्मयाने समृद्ध कसे असायला हवे याविषयीचे प्रत्यक्ष प्रकल्प आढळून येत नाहीत. त्यामुळे या अभ्यासक्रमातून तयार होणारे विद्यार्थी थेट कोणत्याही व्यवस्थापनामध्ये किंवा कार्यालयीन व्यवहारांमध्ये रोजगारास पात्र गणले जात नाहीत. त्यांना पदवी प्रदान झाल्यानंतर नोकरीसाठी आवश्यक असलेले कौशल्य यात टंकलेखन, संगणक ज्ञान याप्रकारच्या गोष्टी शिकाव्या लागतात.

**प्राध्यापकांचा गृहपाठ**

भविष्यातील रोजगाराची संधी मिळविण्यासाठी या विद्यार्थ्यांनी सायबरसाक्षर असणे आवश्यक आहे. तसेच माहितीच्या मायाजालावर आपल्याला आवश्यक असलेली माहिती शोधणे किंवा ती प्रसारित करणे याविषयी ज्ञान त्यांना असणे गरजेचे आहे. नोकरीचा किंवा रोजगाराचा शोध हा आता सायबर विश्वातच केला जातो, तर तो कसा करायला हवा याचेही ज्ञान असायला हवे. एकूणच प्राध्यापकांना सर्वप्रथम या बदलणाऱ्या विश्वाची माहिती असायला हवी आणि विद्यार्थ्यांमध्ये सायबरजागृती निर्माण करायला हवे असलेले आधुनिक गुण-कौशल्य यांचा त्यांनी स्वतः गृहपाठ करायला हवा.

मराठी साहित्य या विषयाचे अध्यापन करीत असताना असे जाणवते की विद्यार्थी हे कोविड १९ रोग प्रादुर्भावाच्या कालखंडात कमालीचे मोबाईलधारक झालेले आहेत. ते पूर्ण वेळ मोबाईलमध्येच रमलेले असतात. मोबाईल मधल्या कोणत्या ॲपवर किंवा खेळामध्ये ते रमलेले असतात ? तसेच त्यांची व्यक्त होण्याची सध्याची भाषा कोणती आहे? हे समजून घेऊ प्राध्यापकांनी त्या विश्वाचा किमान आपल्या विषय स्पष्टीकरणात उल्लेख करायला हवा, तसेच आताच्या पिढीचे व्यक्त होण्याचे माध्यम स्वीकारशील वृत्तीने मान्य करून त्या माध्यमांमध्ये अभ्यासक्रम कसा शिकवता येऊ शकतो याचाही विचार करायला हवा.

**अभ्यासक्रम मांडणी**

'संगीत देवबाभळी' हे नाटक प्रथम वर्ष कला शाखेच्या वैकल्पिक मराठी वाङमय या विषयाच्या प्रथम सत्रातील अभ्यासासाठी अभ्यासमंडळाने नेमलेले आहे. प्रस्तुत नाटक शिकवण्याची पारंपारिक पद्धती ही पुस्तकाचे वाचन, महत्त्वाच्या मुद्द्याचे स्पष्टीकरण अशा स्वरूपाची आहे. खडू-फळा विषय मांडण्यासाठी सहाय्यक साधन म्हणून वापरण्यात येतात. त्याच प्रकारे संबंधित विषयाची विभागणी

१ नाटक साहित्यप्रकार स्वरूप आणि संकल्पना स्पष्ट करणे,

२ नाटकाच्या घटकांचे विश्लेषण करणे,

३ अभ्यासक्रमाला लावलेल्या नाटकातील घटकांच्या वैशिष्ट्यांची चर्चा करणे

४ लेखकाच्या लेखन शैलीची चिकित्सा करणे

अशा स्वरूपाचे आहे. अभ्यासक्रम निश्चिती करीत असताना अभ्यास मंडळाने अपेक्षित केलेला अभ्यासक्रम आराखडा पूर्णपणे योग्य आहे परंतु प्राध्यापकांनी हा आराखडा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवताना १००% व्याख्यान पद्धती वापरणे चुकीचे ठरणारे आहे.

व्याख्यान आणि सहसंवाद या दोन संकल्पना आज प्राध्यापकांनी समजून घ्यायला हव्यात. निरनिराळ्या पाश्चात्य

विद्यापीठांमध्ये व्याख्यानपद्धती ही केवळ विषय स्पष्टीकरणासाठी वापरली जाते. विषय स्पष्टीकरणाचे व्याख्यान चित्रफितीच्या स्वरूपात यूट्यूबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविले जाते. व्याख्यानरूपी माहितीचे स्रोतही माहितीच्या मायाजालात असणे आजच्या सायबर विश्वात अपेक्षित आहे. त्यामुळे प्राध्यापकांनी आपल्याकडे असलेली माहिती व्याख्यान स्वरूपात, चित्रफितीमध्ये मुद्रित करून ती विविध सायबर माध्यमात ( क्लाउड स्टोअरेज) साठवून ठेवायला हवी आणि ती विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध करून द्यायला हवी. सहसंवादही पद्धती म्हणजेच एखाद्या विषयावर विद्यार्थ्यांशी चर्चा करून विद्यार्थ्यांना माहीत असलेल्या घटकांचा वापर करत, तसेच आपल्याला द्यावयाची माहिती यांचा एकत्रित परिणाम साधत, विद्यार्थ्यांपर्यंत संबंधित विषयाच्या माहितीच्या घटकाचे ज्ञानात रूपांतर कसे होईल यासाठी केलेला प्रयत्न असतो. त्यामुळे जेव्हा विद्यार्थी महाविद्यालयात येणार आहे तेव्हा त्याला आज व्याख्यान आहे की आज सहसंवाद आहे याची जाणीव असायला हवी. सहसंवादासाठी त्याने पूर्वतयारी करून यायला हवी. त्यासाठी आवश्यक असलेले अभ्यास साहित्य त्याच्यापर्यंत आधी पोहोचलेले असावे. अशी अपेक्षा केली जाते. या प्रकारची अभ्यास पद्धती विकसित करत प्राध्यापकांना स्वतःच्या संगणक ज्ञानात भर घालणे आवश्यक ठरणार आहे. तसेच आपले सर्व अभ्यास साहित्य मुद्रित स्वरूपात आणि माहितीच्या जालामध्ये स्वतःच्या नावाने टिकवून ठेवायचे कसे हे सुद्धा शिकावे लागणार आहे.

जेव्हा व्याख्याता अनुपस्थित असतो तेव्हा ऑफ-लेक्चर आहे असे संबोधले जाते. ऑफ-लेक्चर म्हणजे विद्यार्थ्यांची पर्वणी असते. जेव्हा विद्यार्थी ऑफ-लेक्चरचा आनंद घेत असतात तेव्हा समजावे की आपली व्याख्यान पद्धती चुकीची आहे. सहसंवादासाठी सुद्धा विद्यार्थी तेव्हाच आकृष्ट होऊ शकतो जेव्हा प्राध्यापकाकडे सहसंवादाचे कौशल्य असणार आहे. विद्यार्थ्यांकडील माहिती बाहेर काढून घेणे आणि ती संस्कारीत करणे ही सुद्धा महत्त्वपूर्ण कला आहे. या कलेमध्ये अध्यापकाने प्राविण्य मिळवणे गरजेचे ठरणार आहे. ज्या पद्धतीने ऑफ-लेक्चरची अपेक्षा विद्यार्थी करीत असतात त्याच प्रकारे नोट्ससाठी सुद्धा विद्यार्थी झगडत असतात. त्या पद्धतीचे पुनरावलोकन होणे आवश्यक आहे. बऱ्याचदा प्राध्यापक श्रुतलेखनाच्या (डिक्टेशन) स्वरूपात नोट्स देण्याचे काम करतात. अर्थात व्याख्यान पद्धतीचा स्वीकार करणारे प्राध्यापक श्रुतलेखनाच्या स्वरूपात आपल्या व्याख्यानाचा बराचसा भाग वापरत असतात. विद्यार्थ्यांची लेखनकौशल्य, त्यांच्या लेखनाचा वेग आणि त्यांचे श्रुतलेखन कौशल्य यासाठी आपल्या उपलब्ध व्याख्यान संख्येतला १०% भाग पुरेसा असतो. परंतु प्राध्यापक ८० ते ९०% श्रुतलेखनाच्या स्वरूपात विषय समजून सांगत असतात. भविष्यात ही पद्धती बंद होत जाणार आहे, प्राध्यापकांनी त्यांच्याकडे असलेल्या अभ्यास सामग्रीचा साठा ब्लॉगच्या स्वरूपात माहितीच्या मायाजालावर साठवून ठेवणे आणि तो विद्यार्थ्यांसाठी किंबहुना संपूर्ण विश्वासाठी खुला करणे आवश्यक आहे. दरवर्षी आपण शिकवत असलेल्या अभ्यासक्रमाविषयी लेखन करून ब्लॉग लेखनाच्या स्वरूपात तो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे आणि व्याख्यानासाठी लागणारा,

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- I JAN - FEB 2023

Original Research Article

श्रुतलेखनासाठी लागणारा वेळ वाचविणे भविष्यात अपेक्षित असणार आहे. त्यामुळे ब्लॉग राइटिंग ही आधुनिक पद्धती प्राध्यापकांनी शिकून घेणे, तिचा वापर करणे आणि विद्यार्थ्यांना ब्लॉग वाचन, मनन आणि लेखन विषयक प्रोत्साहित करणे अपेक्षित असणार आहे.

**संगीत देवबाभळी ( नाटक ) - प्राजक्त देशमुख**

देवबाभळी या नाटकाचे कथानक दोन पात्रांमधील संवादातून साकार होते. संत तुकारामांची पत्नी आवलाई आणि श्रीविठ्ठलाची पत्नी लखुबाई या दोघी मुख्य पात्र म्हणून रंगमंचावर दिसतात. आवलाईच्या पायातील काटा काढणाऱ्या श्रीविठ्ठलाने लखुबाईला आवलाईची सुश्रुषा करण्यासाठी पाठवले आहे. तिचा पाय बरा झाल्यानंतर लखूबाई आवलाईच्या घरातून निघून जाते. या कालावधीमध्ये दोघींच्या संवादातून, वादातून आणि दोघींच्या ईश्वरभक्ती करण्याच्या पध्दतीतून नाटकाचा विषय वाचकापर्यंत पोहचविण्यात येतो. आवलाईला असे वाटते की आपल्या संसाराचे सगळे सारतत्व श्रीविठ्ठलामुळे मोडकळीस आलेले आहे. आपला पती विठ्ठलभक्तीमुळेच संसार सुखापासून दूर गेलेला आहे. त्यामुळे आवलाई श्रीविठ्ठलाला बोल लावत राहते. ती काळ्या, विट्या, पांड्या अशा नावाने विठ्ठलाला पुकारत राहते. आपल्या पतीची होणारी अवहेलना लखुबाईला सहन होत नाही, जी स्त्री आपल्या पतीला वाईट शब्दाने उद्देशते तिच्या पायातील काटा काढण्यासाठी आपल्या पतीने का यावे? तसेच तिच्या सुश्रुषेसाठी आपल्याला का पाठवावे? असा प्रश्न लखुबाईला पडतो. मात्र लखुबाई आणि आवलाई यांच्या संवादातून आवलीची सगुण भक्ती स्पष्ट होत जाते. नित्यनेमाने विठ्ठलाचे नकारात्मक स्वरूपात नाव घेणारी आवलाई ही विठ्ठलाला सगुण रूपात पाहते आहे. विठ्ठल प्रत्यक्ष आपल्या पतीला भेटतो आणि तो आपल्या पतीला आपल्यापासून दूर नेतो आहे, असे तिला सारखे वाटत राहते. नकारात्मक सगुण भक्ती असा विषय या नाटकातून मांडलेला आहे.

ईश्वराने प्रत्यक्ष दर्शन देणे आणि ईश्वराचे मूर्ती रूपात वर्णन करणे या दोन संकल्पना या नाटकामध्ये महत्त्वाचे आहेत. याबाबत दर्शन आणि वर्णन या संकल्पनांचा विचार करावा लागतो. आवलाईला प्रत्यक्ष दर्शन देणारा श्री विठ्ठल लखुबाईला समजल्यामुळे सरते शेवटी लखुबाई विठ्ठलाची मूर्ती स्वतःसोबत न नेता श्री विठ्ठलाने दिलेले सुश्रुषेचे व्रत चिंदी स्वरूपात घेऊन जाते. अर्थात मूर्ती ही केवळ वर्णनात्मक असते दर्शन हे आत्मसाक्षातकारात्मक असते असे यामागचे तत्व दिसून येते.

प्रस्तुत नाटक शिकवत असताना विद्यार्थ्यांना कथानक काही क्षणात सांगून उर्वरित व्याख्यान वेळेचा वापर हा नाटकातील निरनिराळ्या संज्ञा आणि संकल्पना स्पष्ट करण्यासाठी वापरायला हवा. यामध्ये दर्शन- वर्णन, आत्मसाक्षात्कार, नकारात्मक तत्वज्ञान, आस्तिक-नास्तिक, देह हाच गाभारा अशा काही संकल्पनांवर विद्यार्थ्यांनी प्रकल्पात्मक काम करणे

आवश्यक आहे. ग्रंथालय, तसेच माहितीच्या मायाजालावर जाऊन याविषयीची माहिती संकलित करणे आणि त्यानंतर वर्गामध्ये प्राध्यापकांशी या विषयावर विद्यार्थ्यांनी संवाद साधने, ज्या संवादातून भविष्यात विद्यार्थ्यांच्या मनामध्ये या संकल्पनांबद्दल काही ज्ञान विकसित होण्याच्या शक्यता निर्माण होणे. या प्रक्रिया अपेक्षित आहेत.

स्त्रीवादी भूमिका, स्त्रीवादी वाचन आणि प्रत्यक्ष स्त्रीवाद या तीन संकल्पना विद्यार्थ्यांना व्याख्यान पद्धतीतून समजावून सांगण्याऐवजी त्यांना या संकल्पना ग्रंथालय उपलब्ध करून देऊन त्या आधारे निबंध स्पर्धा किंवा ब्लॉग राइटिंग स्पर्धा आयोजित करून प्रकल्प निर्मितीतून समजून सांगावेत. विद्यार्थी केवळ परीक्षार्थी न बनता त्यांच्यामध्ये आधुनिक कलागुण विकसित होणे आवश्यक आहे, या संकल्पनांबाबत जर एखादा व्हिडिओ अर्थात vlog - (व्हिडिओ ब्लॉग) तयार करण्यासाठी सुद्धा विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करायला हवे. एखादा विषय जाणीवपूर्वक आव्हानात्मक काम म्हणून विद्यार्थ्यांना देऊन त्याविषयीची अधिक माहिती विद्यार्थी कसे गोळा करतात? किती वेळात गोळा करतात? आणि त्याचे सादरीकरण कसे करतात? यासाठी विद्यार्थ्यांचे गट तयार करून, त्यांना वर्गातल्या वर्गात मोबाईलचा वापर करत प्रकल्प सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात यावी. ज्या प्रकारे ओपन बुक टेस्ट असते त्याच पद्धतीने मोबाईलचा वापर करत विद्यार्थ्यांना कमी वेळात जास्त माहिती संकलित करण्याचे कौशल्य विकसित करणे याचे कौशल्य विकसित करण्यासाठी संधी उपलब्ध करून द्यायला हवी.

मोबाईल हा एक स्मार्टफोन म्हणून सध्या गणाला जातो. मात्र विद्यार्थी केवळ त्याचा वापर व्हिडिओ पाहणे. मीन्स किंवा रिल्स पाहणे आणि लाईव्ह गेम खेळणे या पुरता मर्यादित स्वरूपात करतात. त्यांना विकिपीडिया, ब्लॉग राइटिंग, ब्लॉग मेकिंग, युट्युब, झूम मीटिंग, फेसबुक लाईव्ह, गुगल मिट या माध्यमांमध्ये कसे स्मार्टपणे काम करावे - हे शिकण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी, आपण शिकवत असलेल्या विषयाच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून देणाऱ्या स्पर्धा किंवा प्रकल्प निर्माण करता यायला हवे.

*संत तुकाराम यांचे कार्यकर्तृत्व स्मार्ट फोनवर कसे शोधावे?*

*पंढरपूर नेमके कोणत्या जिल्ह्यात आहे?*

*पंढरपूर पर्यंत जाण्यासाठी कोणकोणते मार्ग उपलब्ध आहेत?*

*किती वेळात आपण पंढरपूर पर्यंत पोहोचू शकतो?*

याविषयीचे ज्ञान विद्यार्थ्यांना मोबाईलवर सहज मिळू शकते. परंतु तसे मिळवण्यासाठी वर्गातल्या वर्गात काही स्पर्धा आयोजित करून द्यायला हव्यात आणि त्या आधारे विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान कसे सहज मिळवता येईल याकडे त्यांचे विशेष लक्ष वेधून घ्यायला हवे. देवबाभळी या साहित्यकृतीच्या माध्यमातून बाभळी या वृक्षाची माहिती, त्या संदर्भात

असलेल्या आख्यायिका, वाक्प्रचार तसेच बाभळीसारख्या इतर वनस्पती यांचीही माहिती विद्यार्थ्यांनी संग्रह करून ठेवायला हवी. अशा प्रकारे साहित्यकेंद्री किंवा साहित्यकृती केंद्री अभ्यास करता करता विद्यार्थ्यांना आपल्या भोवतालचे जनजीवनत समजायला हवे आणि त्याचबरोबर भविष्यात ते ज्या माध्यमांमध्ये काम करणार आहेत त्या माध्यमांची ही ओळख त्यांना व्हायला हवी अशा स्वरूपाचे अध्यापन अभिप्रेत आहे.

संगीत देवबाभळी या नाटकाचे अजून एक वैशिष्ट्य असे आहे की, हे नाटक केवळ दोन पात्रांचे आहे. या दोन पात्रांमधील संवाद हा फार महत्वपूर्ण काम करतो. त्यामुळे संवाद विषयक प्रकल्प विद्यार्थ्यांना देणे गरजेचे आहे. केवळ संवादाची वैशिष्ट्ये आणि लेखकाची संवादलेखनाची शैली या पुरता मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांची संवादशैली कशी विकसित होईल याचेही प्रकल्प निर्माण करायला हवे. त्यासाठी विद्यार्थ्यांना श्रुतिका लेखन, वृत्तलेखन, वृत्त वाहिनीसाठी लेखन, रेडिओवरील सूत्रसंचालकाचे लेखन अशा पैकी एखाद्या माध्यमातील संवाद लेखनाचे छोटेखानी शिबिर आयोजित करून विद्यार्थ्यांना त्या संदर्भात मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. संवाद हा घटक समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या व्हाट्सअप ग्रुपवर संवाद कौशल्यविषयीची युट्युब लिंक विद्यार्थ्यांना देणे आणि त्या संदर्भात महाविद्यालयात चर्चा करणे, यातून विद्यार्थ्यांना युट्युब मधील ज्ञानाचे भंडार सकारात्मक कसे वापरायचे हे समजू शकेल आणि त्यावर चर्चा करताना प्राध्यापकांनासुद्धा विद्यार्थ्यांच्या आधुनिक कलागुणांचे ज्ञान होऊ शकते. त्या आधारे भविष्यातील शिकवण्याच्या पद्धतीबद्दल अध्यापक अधिक सजग होऊ शकतो

प्रस्तुत साहित्यकृतीमध्ये प्रकाशयोजनेचे सुद्धा महत्त्वाचे काम आहे. त्याच प्रकारे पार्श्वसंगीत, वेशभूषा यांचेसुद्धा महत्व नोंदवावे लागते. एकूणच नाट्यकृतीशी संबंधित असलेल्या प्रत्येक घटकांपैकी किमान एक ते दोन घटक एका वर्षी विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाइन स्वरूपात पोहोचवून त्यांच्या आधुनिक सायबर युगातील कलागुणांना वाव देणे आणि त्यांच्याकडून मोबाईलसारखे माध्यम प्रभावीपणे वापरण्यास प्रोत्साहित करणे हे आधुनिक अध्यापन कौशल्य ठरणार आहे.

मुंबई महानगरासारख्या कॉस्मोपॉलिटीन विभागामध्ये आपल्याला असे आढळून येते की विद्यार्थी हे निरनिराळ्या इव्हेंटमध्ये स्वतःला सामावून घेतात. हे इव्हेंट त्यांना फेसबुक किंवा तत्सम माध्यमांमध्ये समजतात आणि त्या इव्हेंटमध्ये सामावून घेत असताना बेधुंद होणे ही त्यांची एक शैली दिसून येते. गणपती आगमन आणि विसर्जन यांचे जे सोहळे मुंबईमध्ये केले जातात, त्यामध्ये असलेली तरुणांची गर्दी आणि त्यांचे एकूणच देवभोळेपण हे किती खरे आहे? तकलादू आहे! हे समजून घेणे गरजेचे आहे. प्रस्तुत नाटकाच्या संदर्भात अभ्यास करताना असे नमूद करावे लागते की या नाटकांमध्ये ‘देह हाच गाभारा’ ही संकल्पना मांडण्यात आलेली आहे. आत्मसाक्षात्कार, अहम ब्रह्मास्मि, अथ दीप भव, तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार - यासारख्या संकल्पना विद्यार्थ्यांना समजून सांगायला हव्यात. मात्र या संकल्पना केवळ व्याख्यान

पद्धतीतून विद्यार्थी समजून घेतीलच असे नाही. त्यासाठी ते ज्या इव्हेंटमध्ये विशेषत: धर्माच्या इव्हेंटमध्ये सामील होतात. त्या इव्हेंटसंदर्भातच काही उपक्रम राबविणे गरजेचे आहे. निरनिराळ्या धार्मिक, सांस्कृतिक, रूढी परंपरांच्या सणांमध्ये विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण योगदान द्यायला हवे. ज्या गणेशोत्सवाची निर्मिती जनमत तयार करण्यासाठी, कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी, विचार व्यक्त करणारे व्यासपीठ तयार करण्यासाठी झाली, तीच आज वेगळ्या वळणावर विचित्र रूप धारण करीत आहे. तिला संस्कारित करण्याचे काम सुद्धा पर्यायाने तरुण पिढीचे आणि त्यामुळे प्राध्यापकांचे आहे असे म्हणावे लागते. खारीचा वाटा म्हणून प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना या संदर्भातील काही आधुनिक प्रकल्प द्यायला हवेत. जनमत चाचणी, धर्म आणि व्यक्तिमत्व याविषयीचे वादविवाद, निरनिराळ्या सणांमध्ये होणारी आर्थिक उलाढाल, भावनिक नाते याविषयी विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी विचारपीठाची निर्मिती करणे आवश्यक आहे. प्राध्यापकांनी वर्गामध्येच अशा प्रकारची विचारपीठ तयार करावी, जेणेकरून विद्यार्थ्यांचे सभाधारिष्ट वाढू शकते

निबंधाच्या सुरुवातीसच काही पाश्चात्य प्रसिद्ध विद्यापीठांमध्ये वापरण्यात येणारी सहसंवाद ही अध्यापन पद्धती आणि मुंबई, ठाणे आणि एकूणच महाराष्ट्रतील जिल्हाकेंद्रात असलेली क्लाससंस्कृती (टयूशन) यांच्यामध्ये खूप फरक आहे. विद्यार्थ्याला समजावून सांगत असताना सम जाऊन सांगणे अर्थात समांतर जाऊन सांगणे ही कल्पना येथे अपेक्षित आहे. त्यामुळे घरगुती ट्यूशन किंवा क्लास यामध्ये असलेले शिक्षक हे विद्यार्थ्यांना समजावून सांगताना त्यांच्याशी कमालीचे संवादी असतात. व्याख्यान पद्धतीमध्ये हा संवाद तुटून जातो. त्यामुळे स्वाभाविकपणे विद्यार्थी काही क्षण एकाग्र राहतात, परंतु बऱ्याचदा प्रत्यक्ष व्याख्यान सुरू असताना त्यांचे लक्ष विचलित होते. त्यामुळे चर्चात्मक क्लास ही संकल्पना, संवादात्मक क्लास ही संकल्पना आणि प्रयोगात्मक प्रकल्पात ट्यूशन ही संकल्पना एकत्र करत विद्यार्थ्यांना विषयाच्या नेमक्या घटकापर्यंत पोहोचविणे ही प्राध्यापकाचे काम असणार आहे.

**निष्कर्ष**

1. ५ जी नेटवर्कच्या जीवनशैलीमध्ये आवश्यक असलेली कौशल्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या प्राथमिक शैक्षणिक स्तरापासून अवगत करून दिली तरच त्यांना मार्गक्रमण करणे सोयीचे जाणार आहे.
2. भविष्यातील रोजगाराची संधी मिळविण्यासाठी या विद्यार्थ्यांनी सायबरसाक्षर असणे आवश्यक आहे.
3. व्याख्यान आणि सहसंवाद या दोन संकल्पना प्राध्यापकांनी समजून घ्यायला हव्यात.
4. आधुनिक सायबर संकल्पनांवर विद्यार्थ्यांनी प्रकल्पात्मक काम करणे आवश्यक आहे.
5. चर्चात्मक क्लास ही संकल्पना, संवादात्मक क्लास ही संकल्पना आणि प्रयोगात्मक प्रकल्पात ट्यूशन ही संकल्पना एकत्र करत विद्यार्थ्यांना विषयाच्या नेमक्या घटकापर्यंत पोहोचविणे हे प्राध्यापकाचे काम असणार आहे.

## संदर्भ

1. आर्टिफिशियल इंटेलिजन्ट : https://www.techtarget.com/searchenterpriseai/definition/AI-Artificial-Intelligence
2. मुंबई विद्यापीठ, मराठी साहित्य विषयाचा अभ्यासक्रम :https://mu.ac.in/wp-content/uploads/2022/07/Item-No.-5.29-revised-syllabus-of-F.Y.B.A.-Marathi-Ancillary-and-Compulsory-Sem-I-and-II-CBCS.pdf
3. हार्वर्ड बिझनेस स्कूल मधील क्लास :https://youtu.be/p7iwXvBnbIE
4. सहसंवाद पद्धती : https://youtu.be/Zp70pCiqcwk
5. संगीत देवबाभली विषयी ब्लॉग लेखन :https://aditwa.blogspot.com/2022/10/blog-post_8.html
6. ब्लॉग आणि वलोग विषयी माहिती :https://youtu.be/MzX1bcNTz3w

*Cite This Article:*

** प्रा.आदित्य अंकुश देसाई* , (2023). मराठी साहित्य हा विषय सायबर युगात शिकविण्याचे नवे तंत्र, ***Educreator Research Journal, Volume–X, Issue– I, Jan –Feb 2023,*** *209-217.*